**"रसायन-तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई महाराष्ट्र शासन अनुदानित अभिमत विद्यापीठाच्या परिनियमात बदल करण्यास मान्यता देणेबाबत... "**

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन शुध्दीपत्रक क्र. - धोरण -३०११/(५१/१६)/तांशि-२

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक- १७, मे २०१७

**पहा** - १) विद्यापीठ अनुदान आयोग (Institute Deemed to be Universities) नियमन, २०१६, दिनांक ११ जुलै, २०१६

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक धोरण - २०१३/(१३५/१३)/तांशि-२, दिनांक ९ एप्रिल, २०१४

३) शासन शुध्दीपत्रक क्र. - धोरण -३०११/(५१/१६)/तांशि-२, दिनांक १२ मे, २०१६

४) कुलगुरु, रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई यांचे पत्र क्रमांक विकाअ/नियामक मंडळ/३५/२०१७, दिनांक ९ मार्च २०१७

**शासन शुध्दीपत्रक -**

रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई ही Elite संस्था राज्यात अभिमत विद्यापीठाच्या दर्जाने कार्यरत असल्याने या संस्थेचा कारभार विद्यापीठ अनुदान आयोग (Institutions Deemed to be Universities) Regulations, २०१०, दिनांक ३० एप्रिल, २०१० मधील तरतुदीनुसार करणे क्रमप्राप्त ठरत असल्याने संदर्भ - २ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार सदर संस्थेच्या कारभारासंबंधी संस्थेने सादर केलेल्या परिनियमास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, संस्थेच्या परिनियमान्वये मान्यता देण्यात आलेल्या नियामक मंडळाच्या रचनेमध्ये संस्थेच्या बाहेरील प्रतिष्ठीत व्यक्तींचा समावेश केल्यास त्यांच्या ज्ञानाचा उपयोग संस्थेच्या प्रगतीमध्ये करुन घेण्यासाठी कुलगुरु, रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई यांनी शासनास केलेल्या विनंतीनुसार संदर्भ क्रमांक ३ नुसार रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई महाराष्ट्र शासन अनुदानित अभिमत विद्यापीठाच्या परिनियमात बदल करण्यास मान्यता देण्यात आली होती, त्यानुसार सुधारीत नियामक मंडळाचे गठण करण्यात आले होते.

दरम्यानच्या कालावधीत विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत देशांतर्गत कार्यरत अभिमत विद्यापीठांसाठी UGC (Institutions Deemed to be Universities) Regulations, २०१६ अन्वये दिनांक ११/७/२०१६ च्या अधिसूचनेन्वये नविन नियमावली जाहिर करण्यात आलेली आहे. त्यानुसार आवश्यक ते बदल करण्याच्या सुचना विद्यापिठ अनुदान आयोगाकडुन संस्थेस प्राप्त झालेल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानानुसार सुधारित नियमांचा अभ्यास करुन संस्थेने त्यानुसार योग्य ते बदल करुन नियामक मंडळाचे गठणात सुधारणा करण्याचा प्रस्ताव संदर्भाधिन क्रमांक - ४ येथील पत्रान्वये शासनाकडे सादर केला होता. सदर बाब विचारात घेता नियामक मंडळाच्या रचनेत बदल करुन नियामक मंडळाची रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदरच्या सुधारणेच्या अनुषंगाने संदर्भाधिन क्रमांक २ येथील शासन निर्णयातील **BOARD OF GOVERNORS (BoG) चे गठण** अधिक्रमित करुन ते पुढिल प्रमाणे करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई महाराष्ट्र शासन अनुदानित अभिमत विद्यापीठाच्या नियामक मंडळाचे पुर्नगठण करण्यात येत आहे. सदर संस्थेकरीता संदर्भ क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या संस्थेच्या परिनियमातील नियम क्रमांक ८ मधील BOARD OF GOVERNORS (BoG) चे गठण खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

**BOARD OF GOVERNORS (BoG)**

**The Board of Governors shall consist of the following:-**

| | | |
|---|---|---|
| 1 | Vice-Chancellor | - Chairperson |
| 2 | Chancellor's Nominee who is a Distinguished Academician/ reputed industrialist | - Member |
| 3 | Deans, not exceeding two (by rotation based on seniority) | - Members |
| 4 | Head of academic institute/organization of National importance having international standing, to be decided by the remaining members of the Board. | - Member |
| 5 | One eminent industrialist to be nominated by Chancellor in consultation with Board of Management | - Member |
| 6 | Four distinguished alumni members appointed by the Chancellor in consultation with Board of Management (The Alumni Association may recommend a panel of distinguished alumni members for this purpose) | - Members |
| 7 | Additional Chief Secretary/ Principal secretary/Secretary (Higher & Technical Education) Government of Maharashtra (Ex-Officio) or his nominee | - Member |
| 8 | Senior most Professor of the institute with at least one year of service left for retirement | - Member |
| 9 | Registrar of the institute | -Member Secretary |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रकाश भा. आव्हाड)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा. मंत्री, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री / मा. राज्यमंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अध्यक्ष, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली
५. Chairman, Pharmacy Council of India
६. कुलगुरु, रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई
७. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु
८. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठ, लोणेरे, माणगांव, जि. रायगड.
९. Central Project Advisor, National Project Implementation Unit, Noida, U.P.
१०. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, अमरावती, नाशिक
१२. उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व सहसचिव /उपसचिव